# ऑपरेशन 'सिंदूर' ट्रेलर : बदला बाकी


रु.55 प्रति किलो कालीमुछ चावल
रु.55 प्रति किलो बासमती चावल
रु.50 प्रति किलो चिनौर चावल
रु.80 प्रति किलो चना दाल
रु.105 प्रति किलो तुवर दाल
रु.3100 क्विंटल एम.पी का शरबती गेहुँ
हॉटेल, मेस, किराणा व घरगुतीसाठी घरपोच सुविधा व रिपलेसमेन्ट उपलब्ध
अवतार ट्रेडिंग कंपनी
एम-१०५, एम.आय.डी.सी., किरण पाईप के पिछे, जळगांव, मो.9850379271



शिल्पकार विकासाचा...
# देशदूत
आज भविष्यवेध



मुळव्याध, फिशर, भगंदर
इंजेक्शन व लेझरद्धारे उपचार
✓ संडासद्धारे रक्त पडणे व कोंब येणे
✓ गुदमार्गाच्या ठिकाणी खाज, सुज आग व वेदना होणे
✓ गुदमार्ग लहाण होणे ✓ गुदद्धाराजवळ सेप्टीक होणे
✓ माकड हाडाजवळ, खाज, गाठ किंवा पु होणे
कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध.
कृपया येतांना अपॉईमेंट घेऊन येणे...
डॉ.मनोज पाटील
M.S. [Shalya] | F.A.R.C.S. | जनरल सर्जन व गुदविकार तज्ञ
लोढा हॉस्पीटल, जिल्हा बँकेजवळ, रिंग रोड, जळगांव. 70302 33533



इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक १३२ । गुरुवार, दि. ८ मे २०२५ । पाने - ८+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### ऑपरेशन सिंदूर

देशाने करून दाखवले अशीच भावना प्रत्येक सामान्य माणसाच्या मनात आहे. पहलगाममध्ये झालेल्या आतंकवादी घटनेनंतर सामान्य माणसांच्या मनात प्रचंड संताप होता, अजूनही आहे. तो या ना त्या रूपाने समाजमाध्यमांवर व्यक्त होत होता. देशाने कडक प्रत्युत्तर द्यावे अशीच त्यामागची भावना होती. देश चालवतांना सत्तेच्या कारभाऱ्यांना देशाच्या संरक्षणाबरोबरच जागतिक परिघाचाही विचार करावा लागतो. ती नेतृत्वाची कसोटीच मानली जाते. देश, नेतृत्व आणि तीनही सैन्यदले प्रत्येक कसोटीला खरे उतरले. देशाने लोकभावनेचा आदर केला. आतंकवादाला आणि त्याला पोसणाऱ्या देशाला कडक उत्तर दिले. त्यासाठी जगातिक स्तरावर बहुसंख्य देशांचे समर्थनही मिळवले. सर्व पातळ्यांवरच्या मुत्सदेगिरीतील प्रवीणता पुन्हा एकदा जगाच्या लक्षात आणून दिली. फक्त दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले. नागरिकांवर हल्ले केले नाहीत. हे ऑपरेशन पार पडत असताना सगळीकडे मोकड्रिलचीच चर्चा शिगेला पोहोचली होती. सर्वांचे लक्ष तिकडे वेधले गेले होते. त्याचवेळी उपरोक्त ऑपरेशन घडवून आणले. मोकड्रिल मधून लोकशिक्षण घडले असेल तरी तो मुत्सदेगिरीचा एक भाग असू शकेल का? या मोहिमेतून दहशतवादाकडे बघण्याचा देशाचा दृष्टिकोन जगाच्या आणि दहशतवाद्यांच्या ठळकपणे लक्षात आला. काळाबरोबर देश बदलत असला तरी सर्वधर्मसमभावासारखी अनेक मूल्ये मात्र तीच आहेत याची अनुभूती देशवासीयांबरबरच जगालाही दिली. 'ऑपरेशन सिंदूर' ची माहिती माध्यमांना कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमीका सिंग यांनी दिली. आतंकवाद्यांनी धर्माचा वापर फूट पाडण्यासाठी व द्वेष पसरवण्यासाठी केला असला तरी भारत मात्र तसा विचार कधीच करत नाही हेच यातून अधोरेखित होते. पर्यटन हा काश्मीरच्या अर्थकारणाचा आत्मा आहे. गेली दहा वर्षे काश्मीरचे पर्यटन खऱ्या अर्थाने बहरत होते. जे काश्मिरी नागरिकांना स्थैर्य बहाल पान २ वर »

# ठिकाणं 9...90 नेस्तनाबूत!

## पाकच्या छातडावर राफेल धडकले

**नवी दिल्ली ।** दहशतवाद्यांचे अड्डे नसल्याचे दावे करणाऱ्या पाकिस्तानचा भारताने बुरखा फाडला. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या अचूक माहितीच्या आधारे ऑपरेशन सिंदूर आखले आणि दहशतवाद्यांवर मोठा प्रहार केला. यात नऊ ठिकाण निवडत तब्बल ९० दहशतवाद्यांना यमसदनी पाठवले.

पाकिस्तानात कटकारस्थान रचून भारतात रक्तपात घडवणाऱ्या आणि निष्पाप नागरिकांचे प्राण घेणाऱ्या दहशतवादी संघटनांना भारताने त्यांच्याच भाषेत उत्तर दिले. ७ मे रोजीच्या रात्री भारतीय लष्कराने दहशतवाद्यांची झोपच उडवली. अवघ्या २५ मिनिटांत ९ ठिकाणांना जमीनदोस्त करत लष्कराने ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले. या कारवाईत तब्बल ९० दहशतवादी मारले गेले आहेत.

भारतीय लष्कराने केलेल्या हवाई हल्ल्यात दहशतवाद्यांचे अड्डे भूईसपाट झाले. लष्कराच्या तिन्ही दलाने केलेल्या संयुक्त ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मिरमधील ९ ठिकाणांवर हवाई हल्ले करण्यात आले.

ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या काश्मीरमधील दहशतवाद्यांचे वास्तव्य असलेल्या आणि प्रशिक्षण दिले जाणाऱ्या ठिकाणांनाच लक्ष्य करण्यात आले. याच ठिकाणांवर भारतात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचे कट रचले गेले. त्यासाठी दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले गेले होते.




रात्री १ वाजून ५ मिनिटांनी ऑपरेशन सिंदूर सुरु करण्यात आले होते. लष्कराकडून मुझफ्फराबाद, बहावलपूर, मुरीदके, सियालकोट, कोटली, बाग, गुलपूर, भिंबर आणि शकरगढ येथील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला करण्यात आला.

भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मिरातील जैश ए मोहम्मद आणि इतर दहशतवादी संघटनांचे अड्डे उद्धस्त केले. नऊ ठिकाणी करण्यात आलेल्या हवाई हल्ल्यामध्ये ९० दहशतवादी मारले गेले आहेत. भारतीय लष्कराच्या अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितले की, मागील तीन दशकांपासून पाकिस्तानात दहशतवाद्यांचे अड्डे उभे केले जात आहे. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये हे अड्डे पसरलेले आहेत

### कायद्याच्या कक्षेत कारवाई

भारताने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कक्षेत कारवाई केली. या कारवाईचा कोणत्याही नागरी स्थानावर किंवा सामन्य नागरिकांवर परिणाम झाला नाही. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने हे स्पष्ट केले की, ही कारवाई फक्त दहशतवादाविरुद्ध होती. पाकिस्तानच्या सार्वभौमत्वावर हल्ला नाही. पण पाकिस्तानमध्ये या हल्ल्यानंतर खळबळ उडाली आहे. अनेक दहशतवादी अड्डे रिकामी करण्यात आले आहेत. तसेच सीमेवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. भारताने २०१६ मध्ये सर्जिकल स्ट्राईक आणि २०१८ बालाकोट एअरस्ट्राईक केला होता. भारताने पाकिस्तानच्या भूमीवर केलेली ही तिसरी कारवाई आहे.

### ...म्हणून मोहिमेला मिशन सिंदूर नाव

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला तेव्हा महिलांना सोडून त्यांच्या पतींना मारले होते. महिलांच्या कपाळावरचे कुंकू पुसले होते. त्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या पतींना गोळ्या झाडल्या होत्या. त्यालाच प्रत्युत्तर देण्यासाठी या मिशनचे नाव मिशन सिंदूर ठेवले गेले. भारतीय सैन्य दलाने या मिशन अंतर्गत दहशतवाद्यांचे तळ उद्धस्त केले आहेत. या माध्यमातून भारताने दहशतवाद्यांना धडा शिकवला आहे. दहशतवाद्यांनी यापुढे कोणत्याही महिलेचे सिंदूर पुसण्याची हिंमत केली तर ते युद्धासारखे मानले जाईल हा स्पष्ट संदेश या प्रत्युत्तरातून दिला आहे.



## घरात घुसून ठिकाणे उडवली

**नवी दिल्ली ।** दहशतवाद्यांनी केलेल्या पहलगाम भ्याड हल्ल्याची चीड भारतीयांच्या मनात गेली कित्येक दिवस घर करून होती. दोन आठवडे उलटून गेल्यानंतर कारवाई होत नसल्याने अस्वस्थता होती. पण केंद्र सरकार आणि सैन्य दल या भ्याड हल्ल्याचं प्रत्युत्तर देण्याची जोरदार तयारी करत होतं. दहशवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकांचा मृत्यू झाला होता. भारताने या भ्याड हल्ल्याचं चोख प्रत्युत्तर दिलं जाईल हे आधीच स्पष्ट केलं होतं. पण कधी आणि केव्हा हे मात्र निश्चित नव्हतं. अखेर बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला. या ऑपरेशन अंतर्गत एकूण ९ दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला गेला. ही कारवाई योग्य रणनितीनुसार पार पडली.




## 25 मिनिटांत 21 ठिकाणी हल्ला

**नवी दिल्ली ।** लष्कराच्या म्हणण्यानुसार, भारताने मध्यरात्री १ वाजून ५ मिनीटांनी हा हल्ला केला. मध्यरात्री सुरु असेलेला हा हल्ला १.३० वाजेपर्यंत सुरुच होता. या २५ मिनिटांत पाकिस्तानात २१ ठिकाणी हल्ले करण्यात आले. दहशतवाद्यांच्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आलं. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. भारताच्या या स्ट्राइकमध्ये दहशतवादी मसूद अझहरचे कुटुंबही नष्ट झाले. त्याच्या कुटुंबातील १० सदस्यांचा मृत्यू झाला आहे.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा भारताने अखेर बदला घेतला आहे. भारताने पाकिस्तानला असा धडा शिकवला आहे की तो तो वर्षानुवर्षे लक्षात ठेवेल. शूर भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील ९ ठिकाणी हल्ला केला आहे आणि १०० हून अधिक दहशतवाद्यांना ठार मारले आहे. या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आले आहे. या हल्ल्यात भारताने अशी शस्त्रे वापरली की अक्षरश: पाकिस्तानचे तुकडे तुकडे झाले.

या हल्ल्यांमध्ये भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या तिन्ही सेवांच्या अचूक स्ट्राइक शस्त्र प्रणालींचा वापर करण्यात आला, ज्यामध्ये लोटेरिंग शस्त्रांचा समावेश होता. गुप्तचर संस्थांनी पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी छावण्यांवर हल्ल्यांबद्दल माहिती दिली होती. हे हल्ले भारतीय भूमीवरून करण्यात आले. त्यामुळे पाकिस्तानातील दहशतवाद्यांचा खात्मा




करण्यासाठी भारताने नेमके कोणते शस्त्र वापरली याबद्दल नक्कीच सर्वांना जाणून घेण्यासाठी उत्सुकता आहे.

भारताने पाकिस्तानवर हल्ला करण्यासाठी स्कॅल्प क्षेपणास्त्राचा उपयोग करण्यात आला होता. हे क्षेपणास्त्र राफेल विमानातून सोडण्यात आले. स्कॅल्प क्षेपणास्त्राचा वेग मॅक पॉइंट ८ आहे. ते ५६० ते ६०० किलोमीटरपर्यंत मारा करण्यास सक्षम आहे.



## मोदींचा हुंकार

**नवी दिल्ली ।** भारताने पाकव्याप्त काश्मिरवर पाकिस्तानच्या हद्दीत घुसून ऑपरेशन सिंदूर यशस्वी केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जवानांचे अभिनंदन करीत ऑपरेशन सिंदूर तर केवळ ट्रेलर आहे बदला अजून बाकी आहे. असा हुंकार भरला. मध्यरात्री सुरु असलेल्या ऑपरेशन सिंदूरचे वॉर रुममध्ये बसून नरेंद्र मोदी प्रत्यक्ष या मोहिमेत सहभागी झाले होते. यानंतर दुपारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत देखील याबाबत माहिती दिली.


## दोन महिलांनी पाकला सुनावले

**नवी दिल्ली ।** भारताने मध्यरात्री पाकिस्तानात एअर स्ट्राइक केला. त्या संदर्भात आज सकाळी पत्रकार परिषद घेण्यात आली. कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी या संपूर्ण ऑपरेशनची माहिती दिली आहे. पाकिस्तानात ज्या नऊ ठिकाणी एअर स्ट्राइक करण्यात आला. त्यासाठी टार्गेटची खूप विचारपूर्वक निवड करण्यात आली होती. आज या दोन्ही महिला अधिकाऱ्यांनी एअर स्ट्राइकची माहिती देताना पाकिस्तानला पुरतं उघड पाडलं. सगळे पुरावे दाखवले. ६ ते ७ मे च्या मध्यरात्री १ वाजून ५ मिनिटाने ते १.३० पर्यंत ही कारवाई करण्यात आली. पहलगाममधील हल्ल्यातील मृत नागरिकांना न्याय देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर करण्यात आलं.

पाकिस्तानमध्ये दहशतवादी तयार केले जात आहेत. पाकिस्तान आणि पाक अधिकृत पीओकेमध्ये हे अतिरेकी होते. त्याचे पुरावे दिले. इंटलिजन्स माहितीच्या आधारे टार्गेट करण्यात आलं. नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात आली.

सवाई नाला कॅम्प मुजफ्फराबाद - हा लष्करच ट्रेनिंग तळ होता. पहलगाम, गुलमर्ग हल्ल्यातील दहशतवाद्यांनी इथेच प्रशिक्षण घेतलं होतं. या हल्ल्यातील अतिरेक्यांनी इथूनच प्रशिक्षम घेतलं होतं.

सयदना बिलाल कॅम्प - मुझफ्फराबाद जैश-ए-



मोहम्मदचा एरिया आहे. जंगल प्रशिक्षण केंद्र होतं.

कोटली कॅम्प - एलओसीपासून ३० किलोमीटर दूर. लष्करचा बेस होतं. राजोरीत सक्रिय होतो. पुछमधील हल्ला येथूनच तयार झालेल्या अतिरेक्यांनी केला होता.

बर्नाला कॅम्प - भिमभेर एलओसीपासून ९ किलोमीटर दूर आहे. हत्यार हँडलिंग, जंगल प्रशिक्षण केंद्र आहे. अब्बास कॅम्प कोटली - एलओसीपासून १३ किलोमीटर दूर, लष्करचे फियादीन इथे तयार व्हायचे. १५ अतिरेकी राहण्याची सोय.

सर्जल कॅम्प सियाल कोट - अंतराराष्ट्रीय सीमेपासून सहा किलोमीटरवर आहे. मार्च २०२५ मध्ये पोलिसांच्या चार जवानांची हत्या केली. त्या अतिरेक्यांना इथेच तयार केले.

महनूमा जाया कॅम्प सियालकोट - १८ ते १२ किलोमीटर आयबीपासून दूर आहे. हिज्बूलचं केंद्र पठाण कोटचा हल्ला इथूनच झाला.

### केळी भाव

नवती (१) : 1875
नवती (२) : 1675

### मिश्कीली

